# Skilled workers could transform Maha into trillion-dollar economy: Fadnavis

Times News Network

**Pune:** Deputy chief minister Devendra Fadnavis, while speaking at a function in the city, emphasized expanding the base of skilled human resources to make Maharashtra a trillion-dollar economy.

He was speaking at the inauguration of Bharati Hospital's new super speciality facility and students' housing complex marking the 79th birth anniversary of Vidyapeeth founder and late senior congress leader Dr Patangrao Kadam at Bharati Vidyapeeth Educational Complex in Dhankawadi on Sunday.




Sharad Pawar (3rd from L) and Devendra Fadnavis (3rd from R) present the first Dr Patangaro Kadam Memorial Award to Adar Poonawalla

Former union agriculture minister and National Congress Party (NCP) chief Sharad Pawar and Himachal Pradesh chief minister Sukhvinder Singh Sukhu were also present at the event. Chancellor of Bharti Vidyapeeth Dr Shivajirao Kadam, pro-vice-chancellor Dr Vishwajit Kadam, vice-chancellor Dr Vivek Saoji, executive director of the department of health sciences Dr Asmita Jagtap and cabinet minister of Himachal Pradesh Sanjay Awasthi were present.

"Pune has become the state's manufacturing and industrial hub. This could happen because Pune is primarily a pivotal education and research hub providing skilled human resources. Expanding such a skilled workforce through educational institutions can help accommodate the exodus of various industries from China," Fadnavis said.

Adar Poonawalla, owner and chief executive officer (CEO) of Serum Institute of India (SII), was felicitated at the inauguration and presented with the first Dr Patangaro Kadam Memorial Award in recognition of his contribution to the fight against Covid-19.

In his acceptance speech, Poonawalla said, "The entire SII workforce worked tirelessly during the pandemic. You may have seen me on television, but they were working hard to fulfil the delivery of the Covishield vaccine, which our country and the world needed. This could be possible because of the united efforts at the Central and state government, our healthcare workers and manufacturers working together with a common goal."

"Many students want to go abroad for education, but with institutions like this (Bharati Vidyapeeth) and so many others in India, you can fulfil your dreams and ambitions. Even if you want to go abroad, please come back as soon as possible," Poonawalla said.

Pawar, in his speech, urged educational institutes to focus on the ever-expanding field of artificial intelligence (AI). "Educational institutes like Bharati Vidyapeeth should take the lead in nurturing young minds in AI and elevate research work at the global level," he said.

Pawar, during his speech, mentioned how he and Cyrus Poonawala studied together and were good friends.

Sukhu drew attention to opportunities in Himachal Pradesh and spoke about various schemes and projects his government has undertaken.

# वैद्यकीय संशोधनाकडे लक्ष देण्याची गरज

## ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे मत; भारती विद्यापीठच्या वसतिगृह संकुलाचे उद्‌घाटन

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ८** - जगात नवनवे संशोधन होत आहे, बदल होत आहेत, नवे तंत्रज्ञान निर्माण होत आहे. कृत्रीम बुद्धीमत्तेचा आधार घेऊन समृद्ध पिढी घडविण्याचा प्रयत्न होत आहे. संशोधनात लक्ष केंद्रीत करून देशासमोरचे प्रश्न सोडविण्याला हातभार लावावा. आरोग्य विषयक नव्या सुविधा निर्माण करताना वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनाकडे लक्ष देण्याची गरज आहे, असे मत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केले.

भारती विद्यापीठ परिसरात उभारण्यात आलेल्या भारती सुपर स्पेशिआलिटी हॉस्पिटल आणि विद्यार्थी वसतिगृह संकुलाचे उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. नव्या



पुणे : 'डॉ. पतंगराव कदम स्मृती पुरस्कार' अदर पूनावाला यांना प्रदान करताना ज्येष्ठ नेते शरद पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, डॉ. शिवाजीराव कदम, आमदार विश्वजीत कदम.

क्षेत्रातील परिवर्तनाची दिशा भारती विद्यापीठासारख्या संस्था करू शकतील, असा विश्वासही पवार यांनी व्यक्त केला.

यावेळी प्रथम 'डॉ. पतंगराव कदम स्मृती पुरस्कार' वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबाबत अदर पुनावाला यांना प्रदान करण्यात आला. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खु, सीरम इन्स्टिट्यूटचे अदर पुनावाला, खासदार संजयकाका पाटील, भारती विद्यापीठाचे कार्यवाह व आमदार विश्वजीत कदम, विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, कुलगुरू डॉ. विवेक सावजी, भारती विद्यापीठ हेल्थ सायन्सेसच्या कार्यकारी संचालक डॉ. अस्मिता जगताप आदी उपस्थित होते.

### ...तरच देशाची प्रगती - फडणवीस

देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलरकडे नेत असताना देशातील औद्योगिक विकासासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि त्यासाठीची उत्तम शैक्षणिक व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. पुढील २५ वर्ष आपल्यासाठी महत्वाचे आहेत. यात चांगली शैक्षणिक व्यवस्था निर्माण केली तरच आपण आपल्या देशाला प्रगतीकडे नेऊ शकतो, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पुण्यातील औद्योगिक प्रगती येथील शैक्षणिक विकासामुळे झाली. कुशल मनुष्यबळ उपलब्ध असल्याने पुणे राज्याचे उत्पादनाचे केंद्र आणि उद्योगांसाठी आकर्षण होऊ शकले.

अदर पूनावाला म्हणाले की मी कामाच्या निमित्ताने जगभ फिरतो पण जे प्रेम, संधी आणि सहकार्य भारतात मिळते ते अन्य कुठेही नाही. त्यामुळे परदेशा जाऊन शिकणाऱ्या विद्यार्थ्यां मला सांगावेसे वाटते की तुमचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारत विद्यापीठासारख्या दर्जेदार शिक्ष संस्था देशातच आहेत. त्यामुळे भारतात रहा आणि इथेच शिक असे आवाहन त्यांनी केले.

लोकमत




डॉ. पतंगराव कदम स्मृती पुरस्कार सीरम इन्स्टिट्यूटचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला यांना प्रदान करताना कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, शरद पवार, देवेंद्र फडणवीस आणि प्र-कुलगुरू आमदार डॉ. विश्वजित कदम.

# शैक्षणिक संशोधनातून पिढी घडवा : शरद पवार

## भारती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे/धनकवडी :** वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनाकडे जास्तीत जास्त लक्ष देण्याची गरज आहे. नवनवीन तंत्रज्ञान निर्माण होत असतानाच कृत्रिम बुद्धिमत्तेचा आधार घेऊन समृद्ध पिढी घडविण्याचा प्रयत्न शैक्षणिक क्षेत्रात होत आहे. संशोधनात लक्ष केंद्रित करून देशासमोरील प्रश्न सोडविण्याला हातभार लावावा. त्यासाठी भारती विद्यापीठासारख्या शिक्षण संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले.

भारती विद्यापीठाच्या भारती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि विद्यार्थी वसतिगृह संकुलाचे उद्घाटन शरद पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू यांच्या उपस्थितीत रविवारी झाले. यावेळी भारती विद्यापीठाचे संस्थापक कुलपती डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त पहिला डॉ. पतंगराव

### फडणवीस, पवारांचा एकाच गाडीतून प्रवास

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकाच गाडीतून प्रवास केल्याचे रविवारी पाहायला मिळाले. भारती विद्यापीठाचे मेडिकल कॉलेजच्या गेस्ट हाऊसमधून जात असताना पवारांनी फडणवीसांना त्यांच्या गाडीत बसविले. व्यासपीठावरही पवार व फडणवीस शेजारी-शेजारी होते.

### 'केंद्राकडे कोव्हिशिल्डचे डोस पडून'

कोरोनाप्रतिबंधक कोव्हिशिल्ड लसीचे उत्पादन सीरम इन्स्टिट्यूटमध्ये सध्या बंद आहे. मात्र, केंद्र सरकारकडे पुरेशा प्रमाणात कोव्हिशिल्ड लसीचे डोस उपलब्ध आहेत, अशी माहिती सीरम इन्स्टिट्यूटचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला यांनी दिली. भारती विद्यापीठात झालेल्या सत्कार समारंभानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. नोव्होव्हॅक्स व सीरमची संयुक्त लस असलेल्या कोव्होव्हॅक्स लसीबाबत बोलताना ते म्हणाले की, पुढील दहा-पंधरा दिवसांत कोव्होव्हॅक्स लसीला बूस्टर डोस म्हणून परवानगी मिळेल.

पवार बोलत होते.

व्यासपीठावर भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, विद्यापीठाचे कार्यवाह आणि प्र-कुलगुरू डॉ. विश्वजित कदम, कुलगुरू डॉ. विवेक सावजी, आरोग्य विज्ञान विभागाच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप,

विकासासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि त्यासाठी उत्तम शैक्षणिक व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. आज अविश्वासाच्या वातावरणामुळे चीनमधून उद्योग बाहेर पडत आहेत. हे उद्योग भारतात येण्याची सर्वाधिक शक्यता आहे. मात्र, अशा उद्योगांना

# जागतिक पातळीवर संशोधनासाठी विद्यार्थ्यांची फळी उभी राहावी : पवार

## भारती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे उद्घाटन; पूनावाला यांना डॉ. पतंगराव कदम स्मृती पुरस्कार

पुणे : जागतिक पातळीवर उत्तम संशोधन होण्यासाठी विद्यार्थ्यांची नवी फळी उभी राहणे गरजेचे आहे, त्यासाठी भारती विद्यापीठासारख्या शिक्षण संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी केले.

भारती विद्यापीठाच्या भारती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि स्टुडंटस हाऊसिंग कॉम्प्लेक्सचे उद्घाटन पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखु यांच्या उपस्थितीत झाले. भारती विद्यापीठाचे संस्थापक- कुलपती डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंती निमित्ताने पहिला डॉ. 'पतंगराव कदम स्मृती पुरस्कार सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला यांना प्रदान करण्यात आला. त्यावेळी पवार बोलत होते.




**सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला यांना शरद पवार, देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते डॉ. पतंगराव कदम स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. अस्मिता जगताप, डॉ. शिवाजीराव कदम, डॉ. विश्वजित कदम उपस्थित होते.**

या प्रसंगी भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, विद्यापीठाचे कार्यवाह आणि प्र. कुलगुरू, आमदार डॉ. विश्वजित कदम, कुलगुरू डॉ. विवेक सावजी, आरोग्य विज्ञान विभागाच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप, हिमाचलचे कॅबिनेट मंत्री संजय अवस्थी उपस्थित होते.

पवार म्हणाले, आज नव नवीन तंत्र येते आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून शेती, आरोग्य, प्रशासन अशा विविध क्षेत्रामध्ये एक नवी पिढी तयार होते आहे. भारती विद्यापीठाशी संबंधीत सर्वांनी या नव्या क्षेत्रामध्ये योगदान देण्यासाठी पूर्ण ताकदीने उतरावे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, डॉ. पतंगराव कदम हे प्रेम आणि जिव्हाळा निर्माण करणारे जिंदादिल व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी शून्यातून विश्व निर्माण केले. दर्जेदार शिक्षण आणि उत्तम कॅम्पस उभारून त्यातून दर्जेदार मनुष्यबळ उभे करणे ही काळाची गरज आहे. त्या कामात भारती विद्यापीठासारख्या संस्था चांगले योगदान देऊ शकतात.

हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखु म्हणाले, देशाला संकटातून वाचवताना सिरमने महत्त्वाची भूमिका बजावली. या काळात हिमाचल प्रदेशमधील डॉक्टरांनीही फार मोलाचे योगदान दिले आहे. येणाऱ्या काळात वैद्यकीय क्षेत्रासाठी जागतिक दर्जाच्या सुविधा हिमाचलमध्ये उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे सिरम आणि भारती विद्यापीठासारख्या संस्थांनी हिमाचलमध्ये यावे आणि तेथील रोजगाराला गती द्यावी.

डॉ. विश्वजित कदम यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विवेक रणखांबे आणि दुरिया शिपचॅनडलर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अस्मिता जगताप यांनी आभार मानले.

### भारतात राहा, इथेच शिका : पूनावाला

मी कामाच्या निमित्ताने जगभर फिरतो; पण जे प्रेम, संधी आणि सहकार्य भारतात मिळते ते अन्यत्र कुठेही नाही. त्यामुळे परदेशात जाऊन शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मला सांगावेसे वाटते की, तुमचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारती विद्यापीठासारख्या दर्जेदार शिक्षण संस्था देशातच आहेत. त्यामुळे भारतात राहा आणि इथेच शिका, असे आवाहन आदर पूनावाला यांनी सत्काराला उत्तर देताना केले.

